पोलीस ठाणे सी.बी.डी.बेलापूर नवी मुंबई

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** नवी मुंबई  **P.S.(ठाणे):** सी बी डी बेलापूर  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0221  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/12/2019 02:44 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 13/12/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/12/2019
**Time From (वेळेपासून):** 09:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/12/2019  **Time (वेळ):** 01:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/12/2019 02:44 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पहीला मजला , कँटीग,कोकण भवन , सीबीडी,नवीमुंबई

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** संतोष रमेशचंद्र जैसवाल

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

जवळ असलेले शासकीय ओळखपत्र मला दाखविले. त्यावेळी माझी खात्री झाली की, माझेकडे आलेले इसम हे सरकारी नोकर असुन त्यांचे नाव प्रविण वानखेडे आहे.त्यानंतर मी मला मिळालेल्या नोटीसवरील फोन क्रमांक 022-27523369 वर माझ्या फोन वरून फोन केला. व माझ्या नोटीसवर सही करणार अधिकारी श्री.मधुकर देहाडे यांचेसोबत मला देण्यात आलेल्या नोटीसीच्या संबंधाने चर्चा केली असता, त्यांनी मला सांगितले की, तुमचा जो काही दंड आहे तो तुंम्ही ऑनलाईन पद्धतीने भरा. त्याकरीता तुंम्हाला इकडील कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. म्हणुन मी माझा जीएसटी क्रमांकाबाबत ऑनलाईन माहिती घेतली असता, माझा नमुद जीएसटी क्रमांक हा दिनांक 17/07/2017 रोजीच म्हणजेच मी जीएसटी क्रमांक घेतलेल्या दिवशीच बंद झाल्याचे व मला कोणताही दंड आकारण्यात आला नसल्याचे स्टेट्स दिसुन आले. त्या स्टेट्सची मी लागलीच एक प्रिंट काढुन माझ्याजवळ घेतलेली असुन, ती पोनि श्री.जाधव यांना दिलेल्या तक्रारीसोबत सादर केलेली आहे. त्यानंतर दिनांक 11/12/2019 रोजी दुपारी 03:00 वा.चे सुमारास मी नेहमीप्रमाणे माझ्या बियर शॉपवर असतांना विक्रीकर विभाग नवी मुंबई कार्यालयातील कर सहाय्यक श्री.प्रविण वानखेडे हे तेथे आले. व मला म्हणाले की, तुंम्ही दंडाची रक्कम भरलेली नाही अगर मी सांगितले प्रमाणे मला 50,000/- रू देखील दिलेले नाही. आपण दंडाची रक्कम न भरल्यास अगर मला पैसे न दिल्यास तुमचे बंक खाते अटंच करून सीज करण्यात येईल असे सांगितले. परंतु माझा नमुद जीएसटी क्रमांक हा दिनांक 17/07/2017 रोजीच बंद झाल्याचे व कोणताही दंड न भरण्याबाबतची मला खात्री झालेली असतांनासुद्धा श्री. प्रविण वानखेडे हे विनाकारण माझ्याकडे पैशाची मागणी करीत असल्याने व मला त्यांना लाच देण्याची काहीएक इच्छा नसल्याने, मी विक्रीकर विभाग नवी मुंबई कार्यालयातील करसहाय्यक श्री.प्रविण वानखेडे यांची तक्रार करण्यासाठी दिनांक 12/12/2019 रोजी अन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक श्री.प्रफुल्ल जाधव यांना फोनकरून याबाबत माहिती दिली. तसेच माझ्या कामधंदयामुळे मला ठाणे येथे तक्रार देण्यास येता येणार नसुन आपणच मानसरोवर परिसरात येण्याची विनंती केली. त्यामुळे दिनांक 13/12/2019 रोजी पोनि जाधव, पोलीस उपअधिक्षक श्री. दुबे व त्यांचा स्टाफ असे सर्वजण 11:30 वा.चे सुमारास मानसरोवर स्टेशनचे जवळ, शाम सृष्टी बिल्डींग, प्लॉट नं. 3 बी, सेक्टर नं. 17 येथे आले. सदर ठिकाणी त्यांना भेटुन माझी तक्रार पंचासमक्ष सांगितली व स्वतःचे हस्ताक्षरात लिहुन दिली व त्यावर सही केली. सदर तक्रार वाचुन त्यावर दोन्ही पंच व पोनि श्री.जाधव यांनी सहया केल्या . त्यानंतर सदर तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून, मी दिलेल्या तक्रारीनुसार लोकसेवक वानखेडे हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे पोनि जाधव यांनी मला सांगितले. त्यानुसार, दिनांक 13/12/2019 रोजी मी लोकसेवक श्री.वानखेडे यांना फोनद्वारे कधी भेटणार याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला 10 ते 15 मिनीटात शॉपवर येतो असे सांगितले. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर लावुन व पंच भोळे यांचेसोबत पाठविण्यात आले त्यानंतर काही वेळाने लोकसेवक वानखेडे व त्यांचे सोबत एक इसम माझ्या दुकानाजवळ येवुन माझ्या प्रलंबित कामाचे संबंधाने चर्चा करून दहा कमी करून चाळीस हजार लाचेची मागणी केली. तसेच त्यापैकी दहा हजार रूपये हा पहिला हफ्ता अर्ध्या तासात घेण्याचे मान्य करून राहीलेली रक्कम दोन दिवसात घेण्याचे व जीएसटी क्रमांक कन्सल झालेला स्टेट्स दाखविण्याचे मान्य केले. त्यादरम्यान लोकसेवक वानखेडे यांचे समवेत असलेला दुसरा इसम लोकसेवक यानेदेखील लोकसेवक वानखेडे यांच्या वर नमुद म्हणण्यास दुजोरा देवुन मागणी केलेली लाच रक्कम देण्याबाबत मला प्रोत्साहीत केले आहे. सदरवेळी करण्यात पडताळणीमध्ये लोकसेवक वानखेडे यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर पोनि श्री.जाधव यांनी मला लोकसेवक वानखेडे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम आहेत अगर कसे? याबाबत माझ्याकडे विचारणा केली असता, मी माझेकडे व्यवसायातील शिल्लकीचे दहा हजार रूपये उपलब्ध असल्याचे सांगीतले. सदरची रक्कम लोकसेवक वानखेडे यांना देण्याचा निर्णय पोनि श्री. जाधव यांनी घेतला. तसेच लोकसेवक यांनी अर्ध्या तासाने माझ्या दुकानात पैसे घेण्यास येण्याचे मान्य केल्याने पडताळणी-सापळापूर्व-सापळा पंचनामा एकत्रितरित्या करण्याचा निर्णय दोन्ही पंचासमक्ष पोनि श्री.जाधव यांनी घेतला. त्यानंतर सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून, सापळा पूर्व कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर मला लाचेच्या रक्कमेसह पंच क्र. 1 भोळे यांचे सोबत माझे दुकानात पाठविले. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच नं. 2 हे माझ्या दुकानाच्या आसपास थांबून राहिले. परंतु लोकसेवक श्री.वानखेडे यांनी मला फोन करून चहा पिण्यास बाहेर बोलवले असता, दुकानात कस्टमर असल्याने मी बाहेर येवु शकत नसल्याचे कळवुन तुंम्हीच दुकानात या अशी विनंती केली. परंतु ते बराच वेळ वाट पाहुनही लोकसेवक वानखेडे हे आले नसल्याने मी त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांना ऑफीसचे काम लागलेले असल्याने ते नंतर येत असल्याचे सांगितल्याने सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. त्याप्रमाणेच त्याचा पडताळणी - सापळापुर्व-सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला आहे. लोकसेवक वानखेडे यांनी माझ्याशी पुन्हा संपर्क न केल्याने दिनांक 17/12/2019 रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्याचा निर्णय पोनि श्री.जाधव यांनी घेतला. त्यानंतर लोकसेवक श्री.वानखेडे यांना मी फोन लावला असता त्यांनी मला सांगितले की मी व्हिजीटला उरण येथे आहे. तुझे कन्सल चे काम झालेले आहे तु ऑफीसला येवुन जा. असे त्यांनी मला सांगितले तसेच तु टक्स भरण्याची गडबड करू नकोस त्यावर आपण नंतर बोलु. असे कळविले. त्यावरून पोनि श्री.जाधव यांनी लोकसेवक श्री.वानखेडे यांचे बेलापुर कार्यालयात सापळा कारवाई आजमावण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मी व पंच क्र. 1 असे बेलापुर कोकण भवन मधील 4 थ्या माळयावरील वस्तु व सेवा कर विभाग या लोकसेवकाच्या कार्यालयात गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक श्री. वानखेडे हे भेटले नाही. त्यावरून मी लोकसेवकाचे वरिष्ठ श्री. मधुकर देहाडे यांना भेटुण नोटीसीबाबत विचारणा केली असता, त्यांनी वानखेडे यांनाच भेटा परंतु त्यांना यायला उशीर होईल, सकाळी आलात तर भेटेल असे सांगितल्याने त्या दिवसाची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. त्याप्रमाणेच त्याचा सविस्तर सापळा परतीचा पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 19/12/2019 रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्याचा निर्णय पोनि श्री.जाधव, यांनी घेतला. त्याप्रमाणे मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे बेलापुर येथे भेटलो. त्यानंतर सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मी व पंच क्र 1 लाचेच्या रक्कमेसह लोकसेवक यांचे नमुद कार्यालयात आलो असता लोकसेवक श्री. वानखेडे यांची भेट घेवुन त्यांच्यासोबत पहिल्या माळयावरील कन्टीनमध्ये आलो. तेथे माझ्या कामाच्या संबंधाने चर्चा झाली. असता लोकसेवक वानखेडे यांनी माझ्याकडे यापुर्वी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा करून मागणी केली. त्यानुसार आज दिनांक 19/12/2019 रोजी 12:13 वा.लाचेची रक्कम लोकसेवक वानखेडे यांनी स्विकारल्यानंतर त्यांना सापळा पथकाने रंगेहाथ पकडले. तसेच लोकसेवक श्री. वानखेडे यांना सापळा पथकाने त्यांचे सोबत दिनांक 13/12/2019 रोजी त्यांचे समवेत आलेल्या इसमाचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव व तपशील श्री आकाश खोब्रागडे, कर सहाय्यक वस्तु व सेवाकर विभाग, दुसरा मजला, रायगड विभाग असल्याचे सांगितले त्यामुळे लोकसेवक श्री. खोब्रागडे यांना देखील आज दिनांक 19/12/2019 रोजी 12:34 वा. त्यांचे वर नमुद कार्यालयातुन ताब्यात घेण्यात आले. त्याप्रमाणेच त्याचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे.तरी लोकसेवक श्री.प्रविण दशरथ वानखेडे, वय 28 वर्षे, पद.- कर सहाय्यक, वस्तु व सेवाकर विभाग, रायगड विभाग कोकण भवन बेलापुर यांनी माझा जीएसटी क्रमांक हा त्यांचे कार्यालयाकडुन रितसर प्रक्रियेद्वारे बंद झालेला असतांना देखील सदरचे काम हे लोकसेवक क्र. 1 वानखेडे यांनी केले आहे असे भासवुन त्यांनी लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून स्वतःचे फायदयाकरीता माझ्याकडे 40,000/-रूपये लाचेच्या रकमेची मागणी करून त्यापैकी 10,000/- रूपये पहिला हफ्ता स्विकारण्याचे मान्य केले. तसेच नमुद कृत्यास लोकसेवक क्र 2 खोब्रागडे यांनी मला लाच देण्यास प्रोत्साहित केले. त्यानुसार आज दिनांक 19/12/2019 रोजी कोकण भवन इमारतीमधील पहिल्या माळयावरील कन्टीनमध्ये त्यापैकी पहिला हफ्ता 10000/- रुपये लोकसेवक



Scanned by CamScanner

वानखेडे यांनी स्विकारले म्हणुन माझी लोकसेवक वानखेडे व लोकसेवक खोब्रागडे यांचेविरूद्ध फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन तीची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष ही फिर्याद दिली (प्रफुल्ल जाधव) पोलीस निरीक्षकअन्टी करप्शन ब्युरो ठाणे

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Balasaheb Lakshman Rokade
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** DGPBLRM8101 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** JAYRAJ RAMDAS CHHAPRIYA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH52418

पोलीस ठाणे अमलदार
सी.बी.डी. बेलापूर पोलीस स्टेशन
नवी मुंबई



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned by CamScanner